# Importance of time essay in marathi 300 words pdf

निसर्गाने सर्वांना एक गोष्ट समान दिलेली आहे ती म्हणजे वेळ. तुम्ही श्रीमंत असो किंवा गरीब तरीही तुम्हाला २४ तसाच दिलेले आहेत. वेळ ही आपल्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. वेळ पैशांपेक्षा जास्त मौल्यवान आहे कारण एकदा का वेळ गेली की ती परत येत नाही. आपल्याकडे एका दिवसात फक्त २४ तास असतात, जे सर्वांसाठी समान असतात. जर आपल्याला वेळेचे महत्व समजले नाही, तर वेळ आपल्यासाठी ही कधीच थांबत नाही. वेळ ही फक्त पुढेच जाते, ती मागे येत नाही.

आपण पाहिल असेल जर आपण आपला वेळ वायफळ घालवला, तर भविष्यात आपल्याला त्याची किंमत मोजावी लागते. म्हणून वेळेचा आदर करणे आवश्यक आहे, वेळीच काम करणे, वेळीच झोपणे, वेळच्यावेळी त्या त्या गोष्टी कारणे महत्वाचे असते. कारण वेळ ही आपल्याला एकदाच संधी देते. ती संधी एकदा गेली की ती परत मिळत नाही.

ज्यांना वेळेचे महत्त्व कळले त्यांनी मोठा इतिहास रचला आहे. म्हणतात ना पैशाने सर्व काही विकत घेता येते पण गेलेली वेळ नाही घेता येत. आपल्या हातून वेळ वाया जातो त्याला एक कारण म्हणजे आपला 'आळस'. जास्त करून आपण वेळेचे महत्व विद्यार्थ्यांना योग्य वेळी पटवून देणे अवध्यक आहे. कारण आजकालचे विद्यार्थी मोबाईल चा वापर भरपूर करतात. व्हिडिओस पाहणं, रील्स पाहणं यात जास्त वेळ वाया जातो.

जर तुम्हाला एका वर्षाचे महत्व जाणून घ्यायचे असेल तर परीक्षेत नापास झालेल्या एखाद्या विद्यर्थ्याला विचारा. तुम्हाला एका महिन्याचं महत्व जाणून घ्यायचे असेल तर एक महिना अगोदर डिलीवरी झालेल्या आईला तुम्ही विचारा. जर तुम्हाला एका हप्त्याचे महत्व जाणून घ्यायचे असेल तर सप्ताहिकाच्या एका संपादकाला विचारा. जर तुम्हाला एका दिवसाचे महत्व समजून घयचे असेल तर रोज सकाळी कामावर जाणाऱ्या कर्मचाऱ्याला विचारा.याहून पुढे जर एका तसाच महत्व तुम्हाला जाणून घेयायचं असेल तर जो एकढ्याच्या भेटीसाठी वाट पाहत आहे त्याला विचारा. ज्याची रेल्वे एका मिंटाने चुकली आहे त्याला एका मिनिटाचे महत्व विचारा.